RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ४२] गुरुवार, एप्रिल १, २०२१/चैत्र ११, शके १९४३ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ एप्रिल, २०२१

### अधिसूचना

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक. १५२१/प्र.क्र १/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्रामध्ये दिनांक १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक मूवक. १५१८/प्र.क्र.२३/कराधान-१, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) (यापुढे "मूल्यवर्धित कर अधिनियम" असे संबोधण्यात येईल) व केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ (१९५६ चा ७४) (यापुढे "केंद्रीय विक्रीकर अधिनियम" असे संबोधण्यात येईल) अन्वये जोखीम आधारित निर्धारणा निवडीसाठी निकष निश्चित करण्याबाबत अधिसूचना जारी केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र विक्रीकर विभागाद्वारे (यापुढे "विक्रीकर विभाग" असे संबोधण्यात येईल) वस्तू व सेवा कर अधिनियमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे आणि अस्तित्वात असलेल्या मूल्यवर्धित कर अधिनियमाखालील व केंद्रीय विक्रीकर अधिनियमाखालील प्रलंबित कामाचे नियोजन करून त्वरेने निपटारा करण्याची आवश्यकता आहे;

आणि ज्याअर्थी, मूल्यवर्धित कर अधिनियम, केंद्रीय विक्रीकर अधिनियमाखालील प्रलंबित कामाचा निपटारा करण्यासाठी आणि वस्तू व सेवा करासंबंधीच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा प्रभावी वापर व्हावा यासाठी प्रत्येक प्रकरणात बिझनेस इंटलिजन्स डेटा वेअरहाऊस टूल्स किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक डेटा माईनिंग टूल्सचा वापर करून प्राप्त होणाऱ्या संभाव्य महसुला आधारे या अधिसूचनेच्या पुढील खंडामध्ये अनुबद्ध केल्याप्रमाणे संभाव्य महसूल प्राप्ती, किमान महसुलापेक्षा कमी असल्यास, त्याआधारे सदर निर्धारणा कार्यवाही मागे घेण्याविषयी निकष निश्चित करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन सर्व उपयुक्ततेचा विचार करून संभाव्य महसूल किमान महसूल प्राप्तीपेक्षा कमी असल्यास, निर्धारणा कार्यवाही मागे घेण्याबाबत निकष निश्चित करण्यासाठी आणि अशा मागे घेण्यात आलेल्या निर्धारणा कार्यवाहीनंतर शिल्लक निर्धारणा कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी एक योजना तयार करत आहे;

आणि म्हणून, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम २६ख च्या खंड (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पूर्वोक्त प्रयोजनार्थ, शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र. मूवक-२०१८/प्र.क्र. २३क/कराधान-१, दिनांक ११ ऑक्टोबर २०१८ अन्वये यापूर्वी अंमलात आणलेल्या योजने ऐवजी पुढील योजना तयार करत असून, ती यापुढे दर्शविल्याप्रमाणे असेल :—

**१. संक्षिप्त नाव.—** या योजनेस महाराष्ट्र निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासंबंधीचे निकष (संभाव्य महसूल प्राप्तीच्या आधारे) निश्चिती योजना, २०२१ असे संबोधण्यात यावे.

**२. व्याख्या.—**

(१) या योजनेत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) ''अधिनियम'' याचा अर्थ महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) असा आहे ;

(ख) ''पूर्वीची योजना'' याचा अर्थ अधिनियमाच्या कलम २६ख च्या खंड (दोन) अनुसार महाराष्ट्र निर्धारणाकरिता प्रकरणांच्या निवडीचा निकष (संभाव्य महसूल प्राप्तीच्या आधारे) तयार करणारी योजना, २०१८, असा असेल ;

(ग) ''प्रलंबित निर्धारणा कार्यवाही'' याचा अर्थ, निर्धारणेच्या प्रयोजनार्थ निवडलेली प्रकरणे आणि ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी उक्त प्रकरणी निर्धारणेसाठी नोटीस जारी केलेली असो वा नसो ;

(घ) ''समाविष्ट असलेला संभाव्य महसूल'' याचा अर्थ विक्रीकर विभागाकडे उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रॉनिक माहितीच्या विश्लेषणातून दर्शविलेली संभाव्य महसूल प्राप्ती ;

(२) या योजनेमध्ये वापरण्यात आलेल्या परंतु यात व्याख्या न करण्यात आलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना अधिनियम आणि केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ आणि त्याखाली केलेले नियम यामध्ये जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

**३. प्रयोज्यता.-** ही योजना, **राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या दिनांकास प्रलंबित असणाऱ्या सर्व निर्धारणा कार्यवाही संबंधात लागू होईल.

**४. प्रलंबित निर्धारणा प्रकरणे मागे घेण्यासाठीची योग्यता ठरविण्यासाठीची समिती.—**

(१) खालील खंड ६ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या निकषांवर आधारित, जेथे निर्धारणा कार्यवाही मागे घेता येतील अशी प्रकरणांची निवड सुलभ व्हावी यासाठी आयुक्त, सगिती स्थापन करतील, त्यास प्रलंबित निर्धारणा प्रकरणे मागे घेण्यासाठीची योग्यता ठरविण्यासाठीची समिती असे संबोधण्यात येईल.

(२) आयुक्त उप-खंड (१) अन्वये स्थापित झालेल्या उक्त समितीच्या सदस्यांची निवड करतील.

(३) समिती,—

(क) खंड ६ मध्ये नमूद केलेल्या निकषाच्या आधारावर प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठीची प्रकरणे निश्चित करेल व त्याबाबत आयुक्तांना शिफारशी करेल;

(ग) आयुक्तांनी या योजनेच्या प्रयोजनार्थ सोपविलेली इतर कामे पार पाडेल.

**५. संभाव्य महसूल प्राप्ती निर्धारित करणे.—**

(१) या प्रयोजनार्थ आवश्यक असलेले, बिझनेस इंटेलिजन्स डेटा वेअरहाऊस टूल्स (BIDW) किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक डेटा माईनिंग टूल्स यांचा वापर करून आयुक्त संभाव्य महसूल प्राप्ती निर्धारित करतील.

(२) आयुक्त, या प्रयोजनार्थ, नोंदणी, विवरण, लेखा परीक्षण अहवाल आणि भरणा या संबंधित माहिती किंवा यथास्थिती, शासकीय विभागाकडून किंवा शासकीय संस्थाकडून प्राप्त झालेली माहिती यांचा वापर करतील.

**६. प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठीचे निकष.—**

(१) प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्याच्या प्रयोजनार्थ प्रत्येक प्रकरणात संभाव्य महसुलाची परिगणना करण्यात येईल व त्यामध्ये अंतर्भूत असलेला संभाव्य महसूल निश्चित करण्यासाठी आधीच्या योजनेच्या खंड ६ मध्ये दिल्याप्रमाणे किंवा आयुक्तांनी वेळोवेळी, योग्य ठरविलेले असे इतर निकष लागू केले जातील;

(२) दिलेल्या वर्षामध्ये खाली नमूद एक किंवा अधिक निकष, स्वतंत्रपणे किंवा संयुक्तपणे लागू करून, ज्या प्रकरणांमध्ये संभाव्य अंतर्भूत महसूल दहा लाख रुपयांपेक्षा जास्त नाही अशी प्रकरणे प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठी योग्य असल्याचे मानले जाईल.

(क) वरील उप-खंड (१) मध्ये दिलेल्या एक किंवा जास्त निकषांच्या आधारावर;

(ख) विवरणासोबत दाखल करण्यात येणाऱ्या जोडपत्र-झ मध्ये किंवा, यथास्थिती, लेखा परीक्षकाने प्रमाणित केलेल्या आणि व्यापाऱ्याने दाखल केलेल्या लेखा परीक्षण अहवालाचा नमुना-७०४ मध्ये, जोडपत्र-झ मध्ये देयतेमधील फरक उघड झाल्यामुळे.

(३) आयुक्त, वरीलप्रमाणे विनिर्दिष्ट केलेली प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्याची अनुकूलता, संभाव्य महसुलाचा अंतर्भाव, उपलब्ध मनुष्यबळ आणि केली जाऊ शकणारी कामे या आधारे निर्धारित करतील.

**७. आयुक्ताच्या अधिकारांचे सक्षमीकरण.—**

(१) उक्त योजनेच्या उत्तम आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी आयुक्त,—

(क) प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठी समितीने केलेल्या शिफारशी पूर्णतः किंवा फेरबदलासह स्वीकारतील ;

(ख) उक्त योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी सोडवतील आणि त्यासाठी मार्गदर्शन करतील ;

(ग) उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे करावयाच्या एकूण कामाचा बोजा निश्चित करतील ;

(घ) संभाव्य महसूल प्राप्ती निश्चित करण्यासाठीची रूपरेषा आणि त्यासाठी वापरण्याची विश्लेषणात्मक साधने वापरण्याची पद्धती ठरवतील.

(२) आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयाबाबत व्यापाऱ्यास कोणताही प्रश्न विचारण्याचा अधिकार असणार नाही.

(३) प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्याबाबत अथवा मागे न घेण्याबाबतच्या निर्णयामुळे संबंधित व्यापाऱ्यास कोणताही अधिकार किंवा विशेषाधिकार प्राप्त असणार नाही असे मानण्यात येईल आणि प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेणे किंवा मागे न घेण्यामुळे व्यापाऱ्याच्या हितास कोणतीही बाधा येणार नाही असे मानण्यात येईल.

**८. काही निर्धारणा कार्यवाहींवर या योजनेचा परिणाम होणार नाही.-**

(क) ही योजना **शासन राजपत्रात** प्रसिद्धीच्या दिनांकापूर्वी निर्धारणा आदेश पारित केलेले असेल; किंवा

(ख) ही योजना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापूर्वी किंवा त्यानंतर जेथे अधिनियमाच्या कलम ६४ खालील किंवा अधिनियमाच्या कलम ६४ सह केंद्रीय विक्रीकराच्या कलम ९ च्या पोट-कलम (२) खालील अन्वेषणाचा परिणाम म्हणून निर्धारणा कार्यवाही सुरू झालेली असेल ; किंवा

(ग) न्यायाधिकरण किंवा कोर्ट यांच्यासह कोणत्याही अपिल प्राधिकाऱ्याचा निर्देश अंमलात आणण्यासाठी हाती घेतलेली निर्धारणा कार्यवाही, अशा कोणत्याही निर्धारणा कार्यवाहीवर या योजनेचा परिणाम होणार नाही.

**९. प्रलंबित निर्धारणा कार्यवाहीची समाप्तीबाबत.—**

वरील खंड ८ च्या अधीन राहून, एकदा का प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठीची यादी विक्रीकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर म्हणजेच www.mahagst.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आली तर उक्त निर्धारणा कार्यवाही ज्या टप्प्यावर प्रलंबित असेल तेथेच ती समाप्त झाल्याचे मानण्यात येईल आणि अशा मागे घेतलेल्या प्रलंबित निर्धारणेबाबत, पुढे कोणतीही कार्यवाही करण्याचे अधिकार निर्धारणा प्राधिकाऱ्याला असणार नाहीत.

**१०. प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठीच्या प्रकरणांची यादी समाविष्ट असलेला आदेश प्रसिद्ध करणे.-**

आयुक्त वेळोवेळी प्रत्येक वर्षासाठीची प्रलंबित निर्धारणा कार्यवाही मागे घेण्यासाठीच्या प्रकरणांची यादी समाविष्ट असलेला आदेश विक्रीकर विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंदार केळकर,**

शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 1st April, 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT- 1521 / C.R. 1 / Taxation-1.—Whereas, on the implementation of the Goods and Services Tax in Maharashtra with effect from the 1st July 2017, the Government of Maharashtra *vide* Government Notification, Finance Department, No.VAT.1518/C.R. 23/Taxation-1, dated the 23rd February 2018, framed the Scheme for providing the criteria for selective risk based assessments under the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005) (hereinafter referred to as "Value Added Tax Act") and the Central Sales Tax Act, 1956 (74 of 1956) (hereinafter referred to as "the Central Sales Tax Act");

And whereas, the Maharashtra Sales Tax Department (hereinafter referred to as "the Sales Tax Department") is implementing Goods and Services Tax and the pending legacy work under the existing Value Added Tax Act and Central Sales Tax Act need to be planned and disposed expeditiously;

And whereas, for the effective utilization of the available manpower for the disposal of pending work under the Value Added Tax Act, the Central Sales Tax Act and also the work related to Goods and Services Tax, it has become necessary to formulate the criteria for withdrawal of the assessment proceedings where the likely revenue earnings in each such case is determined with the use of the Business Intelligence Data Warehouse tools or such other electronic data mining tools, is less than the threshold as provided in clause 6 of this notification ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient, to formulate a Scheme to decide the criteria for withdrawal of the assessment proceedings based on threshold revenue earnings, below which assessment proceedings may be withdrawn, and complete the assessments that may remain after such withdrawal, in a time bound manner :

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause *(iii)* of section 26B of the Value Added Tax, the Government of Maharashtra, is hereby, in supersession of the Maharashtra Value Added Tax Criteria for Withdrawal (on the basis of probable revenue involved) of the Assessment Proceedings Scheme, 2018, enacts a Scheme for the aforesaid purposes, and in the manner hereinafter appearing, namely:—

1. *Short Title.*—This Scheme may be called the Maharashtra Value Added Tax Criteria for Withdrawal (on the basis of probable revenue involved) of the Assessment Proceedings Scheme, 2021.

2. *Definitions.*— (*1*) In this Scheme unless the context otherwise requires,-

(*a*) "Act" means the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005);

(*b*) "earlier Scheme" means the Maharashtra Criteria for Selection (on the basis of probable revenue earnings) of the cases for Assessment Scheme, 2018 enacted under clause *(ii)* of section 26B of the Act;

(*c*) "pending assessment proceedings" means the proceedings in the cases those are selected for the assessment purpose, notwithstanding the notice for said assessment has been issued or not at any time before the date of publication of this notification;

(*d*) "Probable revenue involved" means the amount of probable revenue indicated on analysis of electronic data available with the Sales Tax Department.

(2) Words and expressions used in this Scheme but not defined shall have the same meaning respectively assigned to them in the Act and the Rules and Scheme made thereunder.

3. *Applicability.* —This Scheme shall apply to all pending assessment proceedings as on the date of publication of this notification in the *Official Gazette*.

4. *Committee for considering the suitability of the pending assessment cases that may be withdrawn.*—

*(1)* The Commissioner may, facilitate the identification of cases on the basis of the criteria specified in clause 6, where assessment proceedings which may be withdrawn, constitute a Committee called "the Committee for withdrawal of pending Assessment Proceedings" or assign the work to the Committee constituted under the earlier Scheme.

*(2)* The Commissioner shall appoint the members of the said Committee constituted undcr sub-clausc (1).

*(3)* The Committee shall,—

*(a)* identify the pending assessment proceedings which may be withdrawn on the basis of criteria mentioned in clause 6 and make recommendation to the Commissioner in this behalf;

*(b)* perform other work as may be assigned by the Commissioner for the purposes of the Scheme.

5. *Determination of probable revenue involved.*—

*(1)* The Commissioner may determine probable revenue involved with the use of Business Data Warehouse Tools (BIDW) or such other electronic data mining tools, as may be necessary for this purpose.

*(2)* The Commissioner may, for this purpose use electronic data related to Registration, Returns, Audit Report and Payments so received or, as the case may be, the inputs received from the Government Departments or the Government Agencies.

6. *Criteria for withdrawal of the pending assessment proceedings.*—

*(1)* For the purpose of deciding withdrawal of pending assessment proceedings, the probable revenue involved in each case may be calculated on the basis of criteria specified in sub-clause (1) of clause 6 of the earlier Scheme or such other criteria as may be decided by the Commissioner, from time to time.

*(2)* Cases where probable revenue involved is not more than ten lakh rupees for a given year whether the said criteria is applied singly or jointly and determined on the basis of,—

*(a)* one or more criteria given in sub-clause (1) above;

*(b)* the differential liability on account of disclosure made in the ANNEXURE-I filed with the return or, as the case may be, in the ANNEXURE-I, of the Audit Report in Form 704 certified by the Accountant and submitted by the dealer, shall be considered suitable for the withdrawal of the pending assessment proceedings.

*(3)* The Commissioner shall decide the suitability of the withdrawal of pending assessment proceedings, after considering the recommendation of the Committee and the probable revenue involved, the availability of the manpower and work load that can be performed.

7. *Empowerment of the Commissioner.*—

*(1)* For better and effective implementation of the Scheme, the Commissioner may,-

*(a)* accept fully or partly the recommendations made by the Committee for selection of the cases for withdrawal of pending assessment proceedings or modify the said recommendations;

*(b)* provide guidance and resolve difficulties in the implementation of the Scheme;

*(c)* assess and decide the total workload based on availability of the manpower;

*(d)* decide the modalities for determination of likely revenue earning and methodology and analytical tools to be used for it.

*(2)* The dealer shall not have any right to call in question the decision taken by the Commissioner under this Scheme.

*(3)* The selection or non-selection of cases for the purpose of withdrawal of pending assessment proceedings shall not confer any right or privilege to the said dealer and shall not to have caused any prejudice so far as it relates to the selection of the cases for the purpose of withdrawal of pending assessment proceedings.

8. *Scheme not to affect certain assessment proceeding.*—The Scheme shall not affect any assessment proceeding,—

(*a*) where the order of the assessment is passed any time before the date of publication of this Scheme in the *Official Gazette*, or

(*b*) where the assessment proceeding is initiated as a result of investigation under section 64 of the Act or sub-section (*2*) of section 9 of the Central Sales Tax Act read with section 64 of the Act, either before or after the publication of the Scheme in the *Official Gazette,* or

(*c*) that is undertaken so as to give effect to the directions of any appellate authority including Tribunal or the Court.

9. *Abatement of the pending assessment proceeding when withdrawn.*— Subject to the provisions of clause 8, once the list for withdrawal of the pending assessment proceeding is published on the Official Website i.e. www.mahagst.gov.in of the Sales Tax Department, then it shall be deemed that the said assessment proceeding stands abated from the stage where it was left and no assessing authority shall be empowered to proceed further, in respect of the pending assessment, so withdrawn.

10. *Publication of order containing list of cases where the pending assessment proceedings are withdrawn.*— The Commissioner shall, from time to time, publish the order containing the list of the cases where the pending assessment proceedings are withdrawn for each year on the Official Website of the Sales Tax Department.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANDAR KELKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.